दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com
● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● बुधवार दि.२ जुलै २०२५ 9422660067 ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २१६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये
● Beed (Mahmar) Daily Marathi ● Wednesday 2 July 2025 9422660067 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 216 ● Pages 4 ● Rate 4 Rs

# मोदी तुमचा बाप असेल,पण शेतकऱ्यांचा बाप होऊ शकत नाही-आमदार नाना पटोले



**मुंबई (वृत्तसंस्था)–विधानसभेच पावसाळी अधिवेशन सुरु आहे. काँग्रेस नेते आणि आमदार नाना पटोले आज सभागृहात प्रचंड आक्रमक झाले होते. नाना पटोले हे विधानसभा अध्यक्षांच्या आसनासमोर धावून गेले. तिथे त्यांची विधानसभा अध्यक्षासोबत वादावादी झाली.विधानसभेच पावसाळी अधिवेशन सुरु आहे. काँग्रेस नेते आणि विदर्भातील आमदार नाना पटोले यांचं आज सभागृहात आक्रमक वर्तन पहायला मिळालं. नाना पटोले हे विधानसभा अध्यक्षांच्या आसनासमोर धावून गेले. या सदनातले सन्मानीय सदस्य लोणीकर आणि राज्याचे कृषीमंत्री सातत्याने शेतकऱ्यांचा अपमान करत आहेत. हा अपमान राज्यातला शेतकरी सहन करणार नाही. मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांची माफी मागावी. मोदी तुमचा बाप असेल, शेतकऱ्यांचा बाप होऊ शकत नाही. हे अजिबात चालणार नाही. कारवाई झाली पाहिजे असं नाना पटोले म्हणाले.**

त्यावर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी नाना पटोलेंच्या भाषेवर आक्षेप घेतला. तुमच्याकडून असंसंसदीय भाषेचा उपयोग होणं मला बरोबर वाटत नाही. हे योग्य नाही असं राहुल नार्वेकर म्हणाले. नाना पटोले आपल्या जागेवरुन उठून राहुल नार्वेकर यांच्या आसनाजवळ गेले. तिथे ते आक्रमकपणे बोलत होते. अखेर विधानसभा अध्यक्षांनी दिवसभरासाठी नाना पटोले यांना निलंबित केलं.जर भाजपचे आमदार आणि कृषीमंत्री मोदी शेतकऱ्यांचा बाप आहे असं बोलत असतील. मोदी यांचा बाप असू शकतो, पण शेतकऱ्यांचा बाप असू शकत नाही. शेतकऱ्यांना अपमानित करण्यासाठी हे सत्तेत आहेत का?. शेतकऱ्यांनी आत्महत्या कराव्यात म्हणून हे सत्तेत आहेत का? यापेक्षा असंवैधानिक काय असू शकतं असा सवाल नाना पटोलेंनी केला. सभागृहातून निलंबन झाल्यानंतर ते बाहेर माध्यमांशी बोलत होते. ते पुढे म्हणाले कि लोणीकरांनी शेतकऱ्यांचा अपमान केला, त्या प्रकरणी मुख्यमंत्र्यांनी माफी मागावी, अशी मागणी पटोले यांनी केली होती. सभात्याग केल्यानंतर नाना पटोले यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले की, सरकारचे नेते शेतकऱ्यांना भिकारी समजतात. कपडे हे घेऊन देतात. २०१४ च्या आधी लोणीकर उघडाच फिरत होता. जो शेतकऱ्यांच्या बाबतीत बोलेल त्याला निलंबित करणे आणि जे अपमान करतात त्यांना सन्मानाने बसवायचे, अशी टीका त्यांनी केली आहे.

## स्वानंद सार्वजनिक वाचनालयात महाराष्ट्र कृषिदिन अर्थात वसंतराव नाईक जयंती साजरी

**केज । प्रतिनिधी**



स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि. बीड येथे १ जुलै २०२५ रोजी महाराष्ट्र कृषिदिन अर्थात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती व्याख्यान कार्यक्रम घेवून साजरी करण्यात आली. यावेळी सर्वप्रथम वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.

त्यानंतर शेतीनिष्ठ शेतकरी दादासाहेब गायकवाड यांचे हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. तसेच रविंद्र गायकवाड( पेन्टर ) यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दिगांबर सुधाकर गायकवाड, सुखदेव गायकवाड, रंजित गायकवाड, आरुण गायकवाड यांची उपस्थिती होती. दादासाहेब गायकवाड,रविंद्र गायकवाड( पेन्टर) यांनी हरित क्रांतीचे प्रणेते व महाराष्ट्राचे भाग्यविधाते वसंतराव नाईक यांच्या जिवन - कार्यावर प्रकाश टाकला. अध्यक्षस्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, ख्यातनाम वक्ते, परखड व्याख्याते प्राचार्य डॉ. वसुदेव( बप्पा) गायकवाड हे होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद( भैय्या) गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाला शेतकरी यांची मोठी उपस्थिती होती.

### खा.सुप्रीताई सुळे यांचा जन्मदिन सामाजिक उपक्रमाने साजरा

## परळी उपजिल्हा रुग्णालयात रूग्णांना फळांचे वाटप;अनेक ठिकाणी वृक्षारोपण

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**



लोकसभेतील संसदरत्न खासदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा सौ.सुप्रियाताई सुळे यांचा सोमवारी जन्मदिवस असल्याने परळी वैजनाथ येथे अनेक सामाजिक उपक्रम घेण्यात आले. उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले तर शहरात विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले.

परळी वैजनाथ येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा, संसदरत्न खासदार सौ.सुप्रियाताई सुळे यांचा जन्मदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के पाटील, पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या मार्गदर्शनाने अनेक उपक्रम राबवण्यात आले. सकाळी ११ वाजता उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले तर १२ वाजता विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.अरुण गुट्टे, पक्षाचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे पाटील, ड.सतीश देशमुख, डॉ.संदीपान काळे, नितीन शिंदे, मुक्ताराम गवळी, रमेशराव ढाकणे, पांगरीचे राजेभाऊ फड, रामभाऊ राडकर, वर्षाताई रायभोळे, दिपाली सावंत, मंगलताई सोळंके, फिरोज सय्यद, रामचंद्र देवकते, रेखाताई जानराव, अश्विनीताई सरवदे, समाधान मुंडे, सनी मस्के, डॉ.बोरा, गोपाळ सलगर, हनुमंत फड, प्रल्हाद गित्ते, इमरोज खान, शेख फिरोज, प्रद्युम्न मुंडे यांच्यासह अनेकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## बीड शहर बचाव मंचाच्या वतीने कृषी क्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांची जयंती साजरी

**बीड । प्रतिनिधी**



हरितक्रांतीचे जनक तथा माजी मुख्यमंत्री वसंतराव जी नाईक यांची आज बीड शहर येथे संत भगवान बाबा चौक या ठिकाणी अर्धाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून तसेच श्रद्धा भावाने अभिवादन करून बीड शहर बचाव मंचाच्या व व कर्मयोगी मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांच्या अनुयायांच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी त्यांच्या कृषी क्षेत्राशी निगडित कार्यावर मान्यवरांच्या वतीने प्रकाश टाकण्यात आला. त्यांनी हरितक्रांतीचे जनक म्हणून संपूर्ण जगात त्यांच्या कृषी व शेतकरी हिताच्या कार्यातून ओळख निर्माण केली. त्यामुळेच संपूर्ण महाराष्ट्र आज सुजलाम सुफलाम व स्वयंपूर्ण झाला आहे. त्यांची दूरदृष्टी हे महाराष्ट्राच्या हरितक्रांतीचे धोतक आहे. यावेळी बीड शहर बचाव मंचाच्या वतीने सर्व मान्यवरांनी वर्तमान तसेच पुढील काळामध्ये माजी मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांच्या विचारांवर वाटचाल करत त्यांनी दाखवलेल्या मार्गाने पावलावर पाऊल ठेवून महाराष्ट्राला कृषी व औद्योगिक विकासाच्या माध्यमातुन प्रगतीपथावर नेण्यात यशस्वी होऊ असा ठाम विश्वास व्यक्त केला. कृषी क्रांती जनक माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीच्या निमित्ताने,डी.जी. तांदळे सर ,नितीन जायभाये, ड.अनिल बारगजे, मा.भूषण पवार, मीनाक्षी देवकते, लताताई राऊत, चित्रपट अभिनेते ड.महेश कुमार वनवे, बाजीराव ढाकणे, अमोल अंकुटे, काँग्रेस पक्षाचे गणेश बजगुडे, रामधन जमाले, गवते सर,अशोक लोढा,मयुरी ताई ढाकणे, जिव्हाळा बेघर केंद्राचे राजाभाऊ वंजारे, छायाताई सरोदे, अभिजीत वैद्य, बालाजी जगतकर,डॉ. संजय तांदळे,बंजारा क्रां. दल रा.म.सचिव शरद राठोड, कॅप्टन जे.डी चव्हाण, जि.प सभापती बाबुराव जाधव, विलास राठोड अंकुश राठोड, परमेश्वर जाधव, सरपंच भाऊसाहेब राठोड, शरद राठोड, प्रभाकर राठोड, राजेश राठोड, अभय चव्हाण, विजय चव्हाण, अशोक चव्हाण, प्रीत कुकडेजा,अशोक लोढा ,डउझख पार्टीचे आबिदभाई सय्यद, अशोक वाघमारे आदी मान्यवर बहुसंख्येने उपस्थित होते.

## धनेगाव कम्प येथे वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा

### व्हॉलीबॉल प्रेमी ग्रुपचा स्तुत्य उपक्रम

**केज । प्रतिनिधी**



पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज आहे. बदलत्या वातावरणाचा पर्यावरणावर होत असलेला विपरीत परिणाम लक्षात घेता एक वृक्ष लावुन जन्म दिवस साजरा करुया पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रयत्न करुया.ही संकल्पना घेऊन व्हॉलीबॉल प्रेमी ग्रुप,धनेगावच्या वतीने व्हॉलीबॉल प्रेमी सत्तार शेख यांच्या वाढदिवसा निमित्त धनेगाव कॅम्प येथील व्हॉलीबॉलमैदान परिसरात वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा करण्यात आला

सद्य परिस्थितीत मोबाईलमध्ये गुंतलेली तरुण पिढी आणि त्यामुळे मैदानी खेळ मोबाईलच्या युगात लोप पावत असताना मात्र धनेगाव कॅम्प व परिसरातील तरुणांनी एकत्र येत व्हॉलीबॉल प्रेमी ग्रुपची स्थापना केली आहे.दैनंदिन हे तरुण मैदानावर एकत्र येत व्हॉलीबॉल खेळाचा आनंद घेत असतात. त्यातील व्हॉलीबॉल प्रेमी सत्तार शेख यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रुपच्या वतीनेवृक्षारोपण करून आगळा वेगळा वाढदिवस साजरा केला आहे.यावेळी रवींद्र नवले,धनंजय गुजर, सिद्धार्थ पोटभरे,सत्तार शेख,सुनील गुजर, अमोल गोरे,सुजय पकवे,सुहास गुजर, गणेश शिंपले,नबी सय्यद,अजय वाघमारे, बालाजी सिरसाट, कैलास गुजर,सिद्धेश्वर गुजर,ओम आंबुरे यांच्यासह व्हॉलीबॉल प्रेमी ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.

## खटोड सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने आषाढी एकादशी निमित्त नवनाथ कथा व कीर्तन सोहळ्याचे आयोजन




**बीड । प्रतिनिधी**

आषाढी एकादशीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रासह देशभरात भक्तीमय वातावरण पाहायला मिळते. पंढरपूर गाठता न आलेल्या भाविक भक्तांसाठी बीड शहरात भक्तिरसाचा आनंद घेता यावा या हेतूने स्वर्गीय झुंबरलालजी खटोड सामाजिक प्रतिष्ठान, बीड यांच्या वतीने दिनांक ४ जुलै ते ७ जुलै २०२५ या कालावधीत नवनाथ कथा व सांप्रदायिक कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.हे चार दिवसीय भक्तिमय आयोजन खटोड प्लाझा, वृंदावन गार्डनच्या पुढे एमआयडीसी रोड, बीड येथे होणार आहे. दररोज सकाळी ११ ते सायंकाळी ९ या वेळेत नवनाथ कथा होणार असून, कथा समाप्तीनंतर कीर्तन सत्र पार पडणार आहे.या सोहळ्यात महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार आणि कथाकार सहभागी होणार असून, विशेष आकर्षण ठरणार आहे साध्वी . सोनाली दिदी करपे (चकलांबा) यांचे नवनाथ कथेचे सखोल व रसाळसंगीतमय निरूपण करणार आहेत. याशिवाय नामवंत सांप्रदायिक कीर्तनकार आपल्या कीर्तनसेवेने भक्तजनांना मंत्रमुग्ध करणार आहेत.गेल्या वीस वर्षांपासून संत विचारांचा प्रचार व प्रसार करण्याचे कार्य खटोड प्रतिष्ठान सातत्याने करत आले आहे. समाजात अध्यात्मिक मूल्ये रुजावीत, संतांच्या विचारांचे चिंतन घडावे याकरिता हे आयोजन विशेष महत्त्वाचे आहे. सर्व भाविक भक्तांनी या चार दिवसीय सोहळ्यात उपस्थित राहून अध्यात्मिक आनंदाचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्वर्गीय झुंबरलालजी खटोड प्रतिष्ठान, बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## संपादकीय..

# पाण्याचे दुर्भिक्ष



पावसाळ्यामध्ये पाऊस कमी पडो अथवा मुसळधार पडो. दरवर्षी फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीपासूनच महाराष्ट्राच्या शहरी व ग्रामीण भागावर पाणीटंचाईचे सावट निर्माण झाले आहे. सप्टेंबरच्या अखेरीस पावसाळी हंगाम संपल्यावर अवघ्या चारच महिन्यांत राज्याच्या विविध भागांमध्ये महिलांना पाण्यासाठी हंडा घेऊन वणवण फिरावे लागत आहे. टँकरमुक्त महाराष्ट्राच्या गेल्या अनेक वर्षांपासून प्रशासनाकडून व त्या-त्या काळातील तत्कालीन सत्ताधाऱ्यांकडून घोषणा करण्यात आल्या असल्या तरी या घोषणांची अद्यापि पूर्तता झालेली नाही. वसुंधरेवर वृक्षसंपदेचे अस्तित्व दिवसेंगणिक कमी होऊ लागल्याने त्याची फार मोठी किंमत तुम्हा-आम्हा सर्वांना मोजावी लागत आहे. मुळातच पाणी अडवा-पाणी जिरवा या घोषणाही केवळ घोषणेपुरत्याच वापरल्या जात असल्याने पाणी कितपत अडविले जाते आणि कितपत जिरविले जाते, हा एक संशोधनाचा विषय आहे. फाऊंडेशनवरच आजही दिसत आहेत. पाण्याची पातळी खालावत गेल्याने शेतकऱ्यांना दरवर्षी विहिरींमध्ये खोदकाम करावे लागत आहे. एकट्या महाराष्ट्रातच सुमारे ५७ हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक धरण-प्रकल्पांवर झालेली आहे आणि तरीही गेल्या काही वर्षांमध्ये धरणे आणि कालव्यांतून ओढलेल्या पाण्यामुळे साध्य होणारे प्रत्यक्ष सिंचन वरचेवर घटतच गेले आहे. महाराष्ट्रात शेततळ्यांसाठी आतापर्यंत अंदाजे ९० हजार शेततळ्यांची कामे पूर्ण झाली आहेत, ज्यासाठी १० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आजही ठाणे, पालघर, रायगड या शहरी भागाकडे वाटचाल करणाऱ्या जिल्ह्यांतील ग्रामीण भागामध्ये पाण्याचे टँकर तेथील रहिवाशांची तहान भागविण्यासाठी सेवा देताना पाहावयास मिळत आहेत. मुळात राज्यात आजही टँकर लॉबी प्रभावी असल्याने राज्यात दुष्काळ पडणे व स्थानिक रहिवाशांकडून पाण्याच्या टँकरची मागणी वाढणे ही टँकर मालकांच्या अर्थकारणासाठी सुखावह बाब आहे.

अर्थांत तो भाग वेगळा आहे. मुळातच महाराष्ट्राला टँकरमुक्त करण्यासाठी प्रशासनाकडून गांभीर्याने प्रयत्न केले जात नसल्याने व राजकीय घटकांकडून त्याबाबत जागरुकता दाखविली जात नसल्याने नजीकच्या काळातही टँकरमुक्त महाराष्ट्र हे चित्र वास्तवात निर्माण होण्याची कोणतीही चिन्हे नाहीत. पाण्याचा होत असलेला अपव्यय व पाणी संपत्तीचे न जाणलेले गांभीर्य यामुळेही पाणीटंचाईचा विळखा दिवसेंगणिक घट्ट होत चालला आहे. विदर्भ असो वा उत्तर महाराष्ट्र तसेच सुजलाम, सुफलाम म्हणून गणल्या जाणाऱ्या पश्चिम महाराष्ट्रातील काही भागातही पाणीटंचाईमुळे टँकर फिरताना दिसून येत आहे. पाणी घेऊन फिरणारे टँकर ही आपणासाठी भूषणावह बाब नाही, तर तो आपणासाठी एक प्रकारचा काळिमा आहे. ही बाब राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१४ साली ओळखली होती. त्या दृष्टीने त्यांनी २०१४ ते २०१९ या कालावधीत भाजपा-सेनेचे सरकार असताना मुख्यमंत्रीपदावरून काम करताना फडणवीस यांनी शेततळे योजनेला प्राधान्य दिले होते. शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करून त्यांना सरकारकडून अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याचा प्रयत्नही केला होता. त्या कालावधीत सरकारने केलेल्या प्रयत्नामुळे काही प्रमाणात पाण्याची उपलब्धता वाढली होती. पाण्याची भूगर्भातील पातळीदेखील काही प्रमाणात उंचावली होती. शेततळ्यामुळे पावसाच्या पाण्याची साठवणूक झाल्याने आजूबाजूच्या शेतांना तसेच विहिरींनाही त्याचा फायदा झाला होता.

२०१९ मध्ये राजकीय घडामोडी बदलल्याने महाविकास आघाडीचा प्रयोग राबविला गेला व शेततळे योजनेला खिळ बसली आणि याची फार मोठी किंमत महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाला मोजावी लागली आहे. शेततळे योजनेला सरकार दरबारी कानाडोळा झाल्याने पुन्हा 'ये रे माझ्या मागल्या'चा प्रयोग सुरू झाला. महाराष्ट्राच्या शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांकडून टँकरची मागणी वाढू लागली आहे. पाऊस सुरू होण्यास अजून सव्वा ते दीड महिन्याचा कालावधी शिल्लक असल्याने हे दिवस कसे सरणार? या विचारानेच शेतकऱ्यांच्या पोटामध्ये भीतीचा गोळा उठला आहे. धरणातील, तलावातील, विहिरीतील पाण्याने तळ गाठल्याने शेतातील पिके कशी जगवायची, गोठ्यातील दुभत्या जनावरांसाठी पाणी कोठून आणायचे, घरातील माणसांना पाणी कोठून द्यायचे याचीच चर्चा ग्रामीण भागामध्ये सुरू झाली आहे. पाणी कमी पडू लागल्याने अनेक भागामध्ये शेतातील पिकांनी माना टाकल्या आहेत, शेतातील उसाची पाने पिवळी पडली आहेत. जमिनींना भेगा पडल्या आहेत. धरणांचा तालुका अशी बिरुदावली मिरविणाऱ्या जुन्नरपासून सातारा-कोल्हापूर अगदी उत्तर महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातही धरणातील पाणीसाठ्यात मोठ्या प्रमाणावर घट झाली आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये कालव्यातील पाण्याच्या मोटारी तसेच पाईप बाहेर काढण्याचे आदेश पाटबंधारे विभागाकडून त्या-त्या गावातील कर्मचाऱ्यांना देण्यात आले आहेत. नदीपात्रातील मोटारीही पाटबंधारे विभागाकडून हटविण्यात आल्या आहेत. नदीपात्र, धरणाची पात्र पाणीसाठा नसल्याने समाजातील अपप्रवृत्तींनी गाळ, माती उपसा करून त्याची विक्री करण्यास सुरुवात केली आहे.

धरणातील गाळ व माती सुपीक असल्याने शेतकऱ्यांकडून या मातीला व गाळाला मोठी मागणी असते. धरणातील माती शेतात टाकल्याने पिकाचा दर्जा व उत्पादन वाढत असते. वाळू उपशाच्या जोडीने अलीकडच्या काळात धरणातील गाळ व मातीविक्रीचा व्यवसायही फोफावला आहे. पाणी घटल्याने कोरड्या झालेल्या धरण पात्रात माती व गाळाचा बेसुमार उपसा होत असल्याने खड्डे मोठ्या प्रमाणावर वाढीस लागले आहेत. आकाशातून पडणारा पाऊस आता जमिनीत जिरविण्यासाठी प्रशासनाने, राज्यकर्त्यांनी व नागरिकांनीही पुढाकार घेतला पाहिजे. लोकांमध्ये पाणीबचतीबाबत मार्गदर्शन, जनजागृती चळवळ व्यापक प्रमाणावर उभारावी लागणार आहे. ग्रामीण भागात उकाडा वाढत चालल्याने पाण्याचे बाष्पीभवनही मोठ्या प्रमाणावर वाढीस लागले आहे. आधीच धरणातील घटलेला साठा व दुसरीकडे उकाड्यामुळे पाण्याचे होत असलेले बाष्पीभवन यामुळे पाणीटंचाईचा विळखा अधिकच घट्ट होत चालला आहे. वसुंधरेवरील निसर्गसंपदा वाढविण्यावर भर देणे प्रत्येकाची जबाबदारी आहे. श्रमदानातून बंधारे, नदी, धरणे, तलाव यामधील गाळ काढून पाणीसाठा क्षेत्रवाढीकडे भर द्यावा लागणार आहे. पावसाच्या पाण्यामुळे माती वाहून येत असल्याने धरण, तलाव, नदीतील खोलगटपणा कमी झाल्याने पाणी साचून न राहता ते वाहून जाते. निव्वळ कोकणात पडणाऱ्या पावसाचे पाणी जरी जिरविले तरी महाराष्ट्रात एकही टँकर दिसणार नाही, असे म्हटले जाते. कोकणात पडणाऱ्या पावसाचे पाणी नदीजोड प्रकल्प राबवून ते पाणी विदर्भापर्यंत पोहोचविल्यास विदर्भाचा चेहरामोहरा बदलेल. टँकर समस्येवर, पाणीटंचाईवर आता विचारमंथनाची नाही, तर कृतीची गरज आहे. आजवर घोषणा खूप झाल्या, आता कृतीची गरज आहे.

# जगाची आर्थिक कोंडी



सध्या जागतिक बाजारपेठेवर अधिराज्य गाजवण्याची अमेरिका लागली असून सर्व देश एकमेकांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करत आहेत. काश्मीरमधील ताज्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील नगण्य व्यापार जवळपास टप्प झाल्याची स्थिती आहे. आज जगातील अनेक भागांमध्ये युद्धजन्य स्थिती आहे. या सगळ्यात आर्थिक कोंडी होण्याची दाट शक्यता आहे हे नाकारण्यात अर्थ नाही.

सध्याच्या वैज्ञानिक, आधुनिक युगात साडेसाती, पत्रिका, नशीब, भविष्य, ज्योतिष यावर विश्वास ठेवायचा की नाही हा वैयक्तिक प्रश्न आहे. तो अंधश्रद्धा की श्रद्धेचा भाग, हा प्रश्नही निर्माण होऊ शकतो. पण निव्वळ भावार्थाने, लक्षार्थाने, शब्दार्थाने म्हणायचे झाल्यास सध्याच्या जागतिक अर्थकारणाला साडेसाती लागली आहे का, हा प्रश्न पडतो. तसे पाहायला गेले, तर अर्थशास्त्र आणि नशीब या दोन गोष्टींचा संबंध नसतो. पण अर्थकारण चांगले असते, त्याचे नशीबही चांगले असते असे मानले जाते आणि नशीब चांगले असते त्याचे अर्थकारण सुदृढ असते असेही मानले जाते. पण सध्या तरी जागतिक अर्थकारणाच्या नकाशावर वा पटलावर लक्ष दिले, तर लक्षात येणारी गोष्ट म्हणजे प्रत्येक देशाबाबत या ना त्या स्वरुपात जागतिक अर्थकारणाच्या दृष्टिकोनातून अडचणी निर्माण झाल्या आहेत. अगदी आपल्या देशापुरता विचार करायचा झाला तरी काही बाबींकडे निश्चितच अधिक लक्ष द्यावे लागेल.

ताजे उदाहरण घ्यायचे तर, २२ एप्रिल २०२५ ही तारीख भारताच्या इतिहासात कशी नोंदवली जाईल, हे काळच दाखवून देईल. या दिवशी पहलगाममध्ये निरपराध पर्यटकांवर दहशतवादी हल्ला झाला आणि २६ जणांची निर्घृण हत्या करण्यात आली. याच दिवशी भारताच्या अंतर्गत बाजारामध्ये सोन्याचे भाव एक लाखांपलीकडे गेले. सकृतदर्शनी या दोन घटना एकमेकांशी संबंधित दिसत नाहीत. पण एखाद्या दिवसाची तात्कालिकता सोडली तर लक्षात येणारी गोष्ट म्हणजे गेल्या काही वर्षांचा जागतिक इतिहास सांगतो की, या ना त्या स्वरुपाची जागतिक, राजकीय, सामाजिक, भौगोलिक, स्थानिक, राष्ट्रीय आणि जागतिक स्थिती अस्थिर वा अनिश्चित होत जाते त्यावेळी सोन्याचे भाव वरच्या पातळीवर जातात. वाचकांना आठवत असेल की, कोरोनानंतरच्या काळामध्ये सोन्याच्या भावाने अशीच उसळी घेतली होती. यामध्ये सोन्याचे बहुमूल्यत्व फार मोठ्या प्रमाणावर लगेचच वाढते अशातला भाग नाही. पण इतर कोणताही पर्याय उपलब्ध नसतो तेव्हा सोनेखरेदीकडील कल वाढतो, हा आजपर्यंतचा इतिहास आहे. अशा वेळी सोन्याचे भाव वाढणे हे आर्थिक कोंडीचे एक कारण असते की परिणाच असतो, हा प्रश्न उभा ठाकल्याशिवाय राहत नाही. ही आर्थिक कोंडी शब्दप्रयोगाच्या अनुषंगाने 'आर्थिक' असली तरी नानाविध कारणांनी ती वाढत असते. अगदी साधे उदाहरण घ्यायचे तर, २२ एप्रिलला पहलगाममधील घटनेनंतर सहज, स्वाभाविक आणि नैसर्गिक प्रतिक्रिया म्हणून केंद्र सरकारने काही कडक पावले उचलली आहेत. मुळातच भारत आणि पाकिस्तान यांच्यातील व्यापार नगण्य होता. आता तर तो शून्यावर येऊन थांबला आहे. राजनैतिक संबंधांमध्येही दूतावासातील कर्मचाऱ्यांची संख्या कमी करण्यापासून आपले हवाई क्षेत्र एकमेकांना वापरण्यावर बंदी घालण्यापर्यंत आणि यापुढे भारतीय नद्यांचे पाणी पाकिस्तानला देणार नाही, असा निश्चय करण्यापर्यंत ठाम भूमिका जाहीर करण्यात आली आहे. या प्रकरणामध्ये चीनची मूक संमती वगळता पाकिस्तानच्या बाजूने अन्य कोणीही उभे राहिलेले नाही. स्वाभाविकच यातून भारत आणि पाकिस्तानमधील आर्थिक कोंडी वाढेल, अशातला भाग नाही.

याखेरीज सध्या जगाच्या पटलावर असे हे एकमेव उदाहरण आहे, अशातील भागही नाही. कारण त्याच दुर्दैवी आठवड्यामध्ये युक्रेनच्या अध्यक्षांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेतली होती. झेलेन्स्की यांनी काहीच दिवसांपूर्वी अमेरिकेच्या उपराष्ट्राध्यक्षांचीही भेट घेतली होती. अमेरिकेचे हेच मोठे नेते दहशतवादी हल्ला झाल्याच्या दिवशी भारतात होते. युक्रेनच्या अध्यक्षांचे आणि अमेरिकेच्या उपराष्ट्रपतींच्या भेटीचे परिणाम वा ही भेट अत्यंत वाईट असल्याचे जगाने पाहिले आहे. पण काही दिवसांनंतर झेलेन्स्की यांनी अमेरिकेच्या राष्ट्रप्रमुखांची भेट घ्यावी आणि ट्रम्प यांनी ही भेट समाधानकारक झाल्याचे सांगावे ही बाब नोंद घेण्याजोगी आहे. मात्र या भेटीनंतर ट्रम्प यांनी रशियाला सध्या युक्रेनशी असणारे युद्ध थांबवण्यात स्वारस्य नसल्याचेही स्पष्ट केले होते. ही पुढील घटनांची चाहुल आहे का, यावर विचार करावा लागेल.चीन आणि भारत यांचे संबंध 'तुझे माझे जमेना आणि तुझ्यावाचून सरेना' असे राजनैतिक स्वरुपाचेच असतात अशातील भाग नाही. 'पहलगामकी क्या पहचान, चीन और पाकिस्तान' असा विचार मांडणारी मंडळी आजही आपल्याकडे आणि जगभर कार्यरत आहेत हे इथे लक्षात घेण्याजोगे आहे. अशा परिस्थितीत चीन, रशिया आणि अमेरिका यांचे जागतिक व्यापारावर आपले वर्चस्व गाजवण्याचे प्रयत्न नक्कीच सुरू झाले आहेत. यातूनच येणाऱ्या काळामध्ये अस्तित्वात असणारे कडवट संबंध पराकोटीला जातील का, हा प्रश्न पडतो. युरोपीय देशांची परिस्थिती (जर्मनीचा अपवाद वगळता) काही प्रमाणात तरी नकारात्मक आहे. त्यामुळे भारतासारखी सर्वात मोठी अर्थव्यवस्था, त्याच्या लोकसंख्येचा आकार, भौगोलिक आकार आणि बाजारपेठेचा आकार या सगळ्या निकषांचा विचार करता त्याची स्थिती बेताची असणे किंवा आपला देश युद्धग्रस्त असणे ही बाब जागतिक अर्थकारणातील मोठी अडचण ठरू शकते. यातून भारताची स्वत:ची आर्थिक कोंडी होऊ शकते तसेच भारताच्या व्यापारक्षमतेवर तात्कालिक स्वरुपाचा परिणाम झाल्यामुळे जागतिक व्यापाराचा वेग, प्रभाव, प्रचार, प्रसार, त्वरण आणि वस्तुमान हे सर्व कमी होऊ शकते. त्यामुळे भारत हे आर्थिक कोंडीचे कारण असेल की आर्थिक कोंडीचा परिणाम असेल याचाही विचार करावा लागेल.

एकंदरीतच, अर्थकारणाची नदी वेगवान असेल तितके जागतिक सामंजस्य वेगवान राहते असा समज आहे. तलवारीच्या टोकावर व्यापार करण्याचा काळ आता इतिहासजमा झाला असला तरी व्यापारी जमेचा इतिहास नेहमी सामर्थ्यावर चालतो ही वस्तुस्थिती आहे. असा विचार करताना एकदंरित कोरोनानंतरच्या काळात निर्माण झालेल्या संधी, दोष, परिणाम आणि कारणे गेल्या काही आठवड्यात एका सर्वोच्च पातळीवर आल्या आहेत. या सगळ्याचा एकत्रित परिणाम म्हणून कोणत्याही राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत गुंतवणूकयोग्य रकमेचे वाढीव प्रमाण (इन्वेस्टेबल सरप्लस) सोन्याच्या खरेदीकडे वळते का, हे पाहावे लागेल.

जगाच्या नकाशावर नजर टाकली तर सध्या किमान पाच ते सात ठिकाणी युद्धसदृश परिस्थिती आहे. कॅनडा आणि अमेरिकेतील संबंध, जानेवारी २०२५ मध्ये अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कारभार स्वीकारल्यावर काही देशांबाबत टॅरिफची केलेली घोषणा, टप्प्याटप्प्याने होणारी त्याची अंमलबजावणी, काही बाबतीतील घुमजाव यातून आज पूर्णपणे नाकेबंदी झाली नसली तरी मनामध्ये आणि जनामध्ये एक प्रकारची अस्थिरता निर्माण झाली आहे. आज आंतराष्ट्रीय अर्थकारणात अमेरिका ही एकमेव महासत्ता आहे. हा देश एकाच वेळी उत्पादक आहे आणि उपभोक्ताही आहे. तेलबाजारात अमेरिकेबाबत म्हटले जाते की, तो स्वत:च्या देशात उत्पादित होणारे तेल सरप्लस म्हणून बाजूला ठेवतो आणि आंतरराष्ट्रीय तेल व्यापारातून दैनंदिन उपभोग पूर्ण करतो. त्यामुळेच आता अमेरिकी वा जागतिक तेल बाजारामध्ये पेट्रो डॉलर ही संज्ञा कार्यरत झाली नसली तरी अमेरिकेने वेगवेगळ्या देशांबाबत तेलासहित तंत्रज्ञानामध्ये केलेली गुंतवणूक हा ही एक वेगळ्या अभ्यासाचा मुद्दा म्हणावा लागेल. अशी परिस्थिती निर्माण होते तेव्हा अनेक देशांच्या अर्थकारणाच्या नाड्या काही मोजक्या देशांच्या हातात राहतात. अशा वेळी या मोजक्या देशांनी आक्रमक भूमिका घ्यावी हे सोयीस्कर विधान असते. पण ते कृतीत येणे, असणे आणि राहणे ही सदैव चालणारी प्रक्रिया नसते. निदान सध्याच्या काळात तरी ती नाही. थोडक्यात, अनेक राष्ट्रांच्या मनात असणारी आशंका, आरोप यातून जागतिक बाजार, जागतिक गुंतवणूक आणि जागतिक अर्थकारण एका आर्थिक कोंडीत सापडले आहेत, हे नक्की.

# मराठवाडा तहानलेलाच



उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे. त्याच तुलनेत मराठवाड्यात तहानलेल्या गावांच्या संख्येतही दुप्पटीने वाढ होत आहे. मराठवाड्यात १८४ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक तहानलेली गावे मराठवाड्यातच नोंदवली गेली आहेत. विभागीय आयुक्तालयाने यावर शिक्कामोर्तबही केले आहे. पाणीटंचाईची भीषण परिस्थिती छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांत जाणवत आहे. गेल्या वर्षी पाऊस चांगला झाला असला तरी, टंचाई मात्र कमी झालेली नाही. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १३५ टँकरद्वारे तहानलेल्या ९३ गावांत व १२ वाड्यांना पाणीपुरवठा केला जात आहे. जालना जिल्ह्यात मागच्या आठवड्यापर्यंत ४७ टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागला, तर नांदेड जिल्ह्यात दोन टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असल्याची नोंद विभागीय आयुक्तालय कार्यालयात आहे.

मराठवाड्यात काही दिवसांपूर्वी अवकाळी पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले. नुकसानीचे पंचनामे लवकर होतील, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करित आहेत. या संकटातून शेतकरी सावरले असतानाच पुन्हा पाणीटंचाईच्या झळा सोसाव्या लागत आहेत. सध्या कडक उष्णता जाणवत असल्यामुळे मराठवाड्यात गरज असलेल्या जिल्ह्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, नांदेडपाठोपाठ आता जालना जिल्ह्यातही पाणीटंचाईने डोके वर काढले आहे. या तीनही जिल्ह्यांत तहानलेली गावे व वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे, तर विभागातील अन्य जिल्हे सुदैवाने अद्यापही टँकरमुक्त आहेत. काही जिल्ह्यात टँकरची मागणी असून त्यादृष्टीने प्रशासन स्तरावर कामकाज केले जात आहे. गेल्या वर्षी पावसाने चांगली हजेरी लावली होती. त्यामुळे सध्यास्थितीत अन्य जिल्ह्यांत टँकरची गरज मार्च महिन्यात भासली नाही; परंतु एप्रिल महिन्यात उन्हाची तीव्रता वाढल्याने सर्वच जिल्ह्यांत टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची वेळ येणार आहे. मराठवाड्यात काही ठिकाणी मागच्यावर्षी पाऊसमान चांगले झाल्याने टंचाई निर्माण होणार नाही, असा अंदाज बांधत टंचाई कृती आराखड्यामध्ये एप्रिलपासून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात टँकर सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले; परंतु निम्मा मार्च महिना संपलेला नसतानाच प्रारंभी वैजापूर तालुक्यातील सावखेड खंडाळा, दसकुली, तिद्धी, आधुर, लोणी बु. आधुर, माळीसागज, मकरमतपूर, कनकसागज यासह अन्य काही तालुक्यातील गावांतून टँकर सुरू करा अशी मागणी झाली. प्रारंभी जिल्ह्यातील १६ गावांमध्ये १७ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला होता.

दिवसेंदिवस तहानलेल्या गावांच्या संख्येत भर पडली. त्यानूसार मराठवाड्यात टँकरच्या संख्येतही प्रशासनाला वाढ करावी लागली. मार्च अखेरच्या अहवालानुसार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ९३ गावे व १२ वाड्यांना १३५ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. फुलंब्रीतील १ गावात २ टँकर सुरू आहेत. यासह पैठण तालुक्यातील ११ गावांना ११ टँकरद्वारे, वैजापूर तालुक्यातील १५ गावे व १ वाडीला १६, तर गंगापूर तालुक्यातील तहानलेल्या ७ गावांना १० टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. या प्रमाणे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ९३ गावे व १२ वाड्यांना १३५ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असून टँकरच्या मंजूर फेऱ्यांची संख्या १२१ एवढी असल्याचे विभागीय आयुक्तालयाच्या सूत्रांनी सांगितले, तर मराठवाड्यात २०६ खासगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ७८, जालना ४२, हिंगोली ४४, नांदेड ३६, बीड ३, लातूर १ आणि धाराशिव जिल्ह्यात २ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. यात टँकरसाठी ७५ गावांतील ९२ विहिरींचे, तर टँकर व्यतिरिक्त १०४ गावांतील ११४ खासगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. नांदेड जिल्ह्यातील भोकर तालुक्यातील एका गावाला तसेच माहूर येथील एका गावाला टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. तसेच जालना जिल्ह्यातील २४ गावे व ७ वाड्यांना मिळून ४७ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. जालना तालुक्यातील तहानलेली गावे व वाड्यांना गरजेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. बदनापूर तालुक्यातील १२ गावे व ६ वाड्यांना १८, अंबड तालुक्यातील ८ गावांना १३ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असल्याचे सूत्रांनी सांगितले. दरम्यान संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता प्रशासनाने विहीरींचे अधिग्रहण करण्यावर भर दिला आहे.बीड शहरात सध्या तिव्र पाणीटंचाई आहे. माजलगाव बॅकवॉटर योजनेचे पाणी बीड शहराला १५ ते २० दिवसाला सोडले जात आहे. यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक नागरिक दुचाकी तसेच चारचाकी वाहनातून पाणी आणत आहेत. नागरिकांना पाणीटंचाईमुळे खासगी टँकर चालकांकडून पाणी विकत घ्यावे लागत आहे. २५० ते १ हजार लिटर पाणी टँकरद्वारे घरपोच पोहोचविले जात आहे.

यासाठी नागरिकांना अतिरिक्त पैसे देखील मोजावे लागत आहेत. बीड जिल्ह्यात गतवर्षी वार्षिक सरासरीच्या तुलनेत कमी पाऊस झाल्याने त्याचा फटका उन्हाळ्यात जाणवू लागला आहे. बीड जिल्ह्यातील गोदावरी आणि कृष्णा खोऱ्याअंतर्गत असलेल्या १४३ प्रकल्पांपैकी काही लघू प्रकल्प पूर्णपणे कोरडे पडले आहेत. मध्यम व लघूप्रकल्पांचा पाणीसाठा बाष्पीभवनामुळे आटून गेला आहे. बीड जिल्ह्यातील धरणात केवळ २३ टक्के जिवंत पाणीसाठा शिल्लक आहे. येणाऱ्या तीन महिन्यांत या ठिकाणी मोठ्या प्रमाणात टँकरची गरज भासणार आहे. बीड नगरपालिका येत्या काही दिवसांत १५ दिवसांनंतरच पाणीपुरवठा करू शकेल, अशी परिस्थिती सध्या दिसून येत आहे. लातूर जिल्ह्यातील राणी सावरगाव या ठिकाणी ५ कि.मी. अंतरावरून नागरिकांना पाणी आणावे लागत आहे. तेथील जलकुंभ निकामी असून गेल्या ८ वर्षांपासून पाण्याचा एकही थेंब तेथून मिळालेला नाही. विद्युत मोटार बंद अवस्थेत आहे. घटेवाडीचे ग्रामस्थ दाद मागून थकले आहेत. जलजीवन मिशनअंतर्गत मराठवाड्यात सर्वत्रच कामे ठप्प असल्यामुळे पाण्याची मोठी समस्या निर्माण झाली आहे. एकंदरीत मराठवाड्यातील काही जिल्ह्यात अजूनही टँकरची गरज भासलेली नाही, ही परिस्थिती काहीशी समाधानकारक मानली जात आहे; परंतु येणाऱ्या महिन्यांत मराठवाड्यात उष्णता वाढल्यानंतर पाणीटंचाई भीषण भासणार आहे. त्यासाठी आणखी टँकरची गरज मराठवाड्याला लागणार आहे.

# लेआऊट,फार्म हाऊस आणि मर्सिडीजवाल्यांना कर्ज माफी नाही: खऱ्या गरजू शेतकऱ्यांनाच मिळणार लाभ

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंनी स्पष्टच सांगितले



**अमरावती (वृत्तसंस्था)**–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच अर्थमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय योग्यवेळी घेण्यात येणार असल्याचे सांगितले. आता महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठे विधान केले आहे. ले-आऊटवाल्यांना, फार्म हाऊस वाल्यांना आणि कर्ज काढून मर्सिडीज घेऊन फिरणाऱ्यांना कर्जमाफी मिळणार नाही, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले आहे. अमरावतीच्या कौडण्यापूर येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

पुढे बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, शेतीवर कर्ज काढून ज्यांनी मर्सिडीज घेतल्या, ज्यांचे लेआऊट आहेत, फॉर्म हाऊससाठी कर्ज घेतलेल्यांना कर्जमाफी भेटणार नाही. धन दांडग्याना कर्जमाफी नको, ज्यांना गरज आहे त्यांनाच कर्जमाफी मिळायला हवी. कर्जमाफीसाठी उच्चस्तरीय समिती तयार होत आहे, अधिवेशन काळात ती समिती घोषित करू, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.येत्या ३ तारखेला ४ वाजतापासून रात्री १० वाजेपर्यंत बच्चू कडू यांच्यासोबत विधानभवनात बैठक लावली आहे. माझ्या दालनात बैठका लावल्या आहेत. या बैठकीत ८ ते १० मंत्री सोबत असतील, तेव्हा महत्त्वाच्या निर्णयाचे शासन निर्णय होतील, असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.दरम्यान, राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा कार्यक्रम आणि वेळापत्रक निश्चित करण्यात आले असून ३० जून ते १८ जुलै या काळात पावसाळी अधिवेशन होणार आहे. या अधिवेशनात विरोधी पक्ष हिंदी सक्तीच्या मुद्द्यावरून, शक्तिपीठ महामार्ग तसेच शेतकऱ्यांचे कर्जमाफीवरून सरकारला चांगलेच घेरू शकतात.चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, आपल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने लाडक्या बहिणींसाठी जो महिना १५०० रुपये सुरू केला होता, तो पुढच्या काळात लाडक्या बहिणींना २१०० रुपये देणार आहोत. आम्ही शेतकऱ्यांना शब्द दिला होता की, शेतकऱ्यांना पुढील ५ वर्षे शेतात वीजेचा बिल येणार नाही. तसेच, आमच्या सरकारने सांगितले की, खऱ्या खऱ्या गरजू शेतकऱ्यांना कर्जमाफी आम्ही देणार आहोत.


## सरकाला बहुमत, पण रस्त्यावर आपली सत्ता

## उद्धव ठाकरे यांचा जनसुरक्षा विधेयकाला विरोध

**मुंबई (वृत्तसंस्था)**–हिंदीच्या सक्तीवरून सरकारला माघार घेण्यास भाग पाडणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी आता सरकारच्या जनसुरक्षा विधेयकाला कडाडून विरोध करण्याचे संकेत दिलेत. सरकारने पहलगाम हल्ल्यानंतर जनसुरक्षा विधेयक आणले आहे. पण या विधेयकाच्या माध्यमातून सरकार आपल्या राजकीय विरोधकांना तुरुंगात डांबण्याची स्वप्ने पाहत आहे, असे ते म्हणालेत. पहलगामचे अतिरेकी कुठे गेले? ते भाजपत गेले का? पाहा. या सरकारला सभागृहात बहुमत आहे, पण रस्त्यावर आपली सत्ता आहे, असा टोलाही त्यांनी यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपला हाणला

मुंबईतील आझाद मैदानावर माकपने जनसुरक्षा विधेयकाविरोधात धरणे आंदोलन सुरू केले आहे. उद्धव ठाकरे यांनी सोमवारी या आंदोलनस्थळी भेट दिली. यावेळी त्यांनी जनसुरक्षा विधेयकाच्या माध्यमातून सरकार विरोधकांना तुरुंगात डांबण्याची स्वप्ने पाहत असल्याचा आरोप केला. ते म्हणाले, जम्मू काश्मीरच्या पहलगाम येते अतिरेकी हल्ला झाला. त्यानंतर आत्ता सरकार जनसुरक्षा विधेयक आणत आहे. पण सरकार या विधेयकाच्या माध्यमातून आपल्या राजकीय विरोधकांना तुरुंगात डांबण्याचे स्वप्न पाहत आहे. त्यांनी पहिल्यांदा पहलगामचे अतिरेकी कुठे पळून गेले? हे सांगावे.

भाजप जाणारे सर्वच साधू-संत होतात. मग अतिरेकी कुठे गेले? ते भाजपत गेले का? कारण भाजपत गेले की सर्वकाही माफ होते. ही सत्तेची मस्ती आम्ही चालू देणार नाही. ते आणीबाणीच्या काळातील काळ्या आठवणी सांगत आहेत. पण देशात मागील १० वर्षांपासून अघोषित आणीबाणी आहे. त्याचे काय? त्या विरोधात कोण लढणार? तुम्ही लढणार असाल तर शिवसेना तुमच्यासोबत आहे.



त्याच्याकडे पाशवी बहुमत आहे. ते विधेयक आणू इच्छित आहेत. सभागृहात त्यांच्याकडे बहुमत आहे, पण रस्त्यावर आपली सत्ता आहे, असे उद्धव ठाकरे या प्रकरणी सरकारला निर्वाणीचा इशारा देताना म्हणाले. ते पुढे म्हणाले, काल आपण सरकारला मोठा दणका दिला. ते हिंदीची सक्ती करत होते. आमचा हिंदी भाषेला विरोध नाही. पण आम्ही तिची सक्ती कुणाच्या माथी मारू देणार नाही. त्यामुळे आम्ही महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात सरकारच्या जीआरची होळी केली. त्यानंतर आता जनसुरक्षा विधेयक आणून तुम्ही आपल्या राजकीय विरोधकांना नक्षलवादी ठरवण्याचा प्रयत्न केला, तर आम्ही त्याला विरोध केल्याशिवाय राहणार नाही. सरकारने राजकीय विरोधकांना नक्षलवादी ठरवण्याचा पाप करू नये. हे विधेयक एक तर आणू नका आणि आणले तर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये या विधेयकाला आम्ही विरोध केल्याशिवाय राहणार नाही. तुम्ही सत्तांध जरूर असाल, पण हत्ती मदांध झाल्यानंतर माहूत जसा त्याला अंकुश लावतो. तसा अंकुश हा महाराष्ट्र सत्तांध झालेल्या भाजपला लावल्याशिवाय राहणार नाही. सरकारने दडपशाही केली तर तुरुंग कमी पडतील. तुम्ही आमचा आवाज दाबू शकणार नाही. हिंदी सक्तीच्या विरोधात मराठी माणूस पक्षभेद विसरून एकत्र आला. सरकारला गुडघ्यावर आणले. आता हे विधेयक आणले तर सगळ्या पक्षांनी आणि महाराष्ट्रातल्या तमाम जनतेनी एकत्र येऊन या सरकारला गुडघ्यावर आणावे लागेल, असे ते म्हणाले.जो कुणी भाजप व सरकारविरोधात बोलेल तो देशद्रोही असे या सरकारला वाटते. स्वातंत्र्य लढ्याशी यांचा कोणताही संबंध नव्हता. आताही या लोकांना आपण कसे निवडून आलो हे माहिती नाही. हे लोकसभेला ४०० पार करायला निघाले होते. पण महाराष्ट्रात आपण सर्वांनी त्यांचे उधळलेले गाढव रोखले. पण विधानसभेला त्यांनी अशा काय चाली खेळल्या की ६ महिन्यांत होत्याचे नव्हते झाले. आपल्याला हा धक्का होता. हे असे कसे झाले? असा प्रश्न आपल्याला पडला. मला कल्पना आहे की आपण सगळेजण महाविकास आघाडीच्या सोबत होतात. आमच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून आपण सुद्धा प्रचार केला होता आणि हेच त्यांच्या डोळ्यामध्ये खुपत आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

## राज्यात गरीब, दुर्लक्षित समाजावर अन्याय:जयंत पाटील यांचा आरोप

**मुंबई (वृत्तसंस्था)**–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारचे आर्थिक संतुलन ढासळले आहे. परिणामी, राज्यात गरीब व दुर्लक्षित घटकांवरील अन्याय वाढला आहे, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सोमवारी केला.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सोमवारी सुरूवात झाली. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी ५७ हजार ५०९ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या. त्यावरून माजी अर्थमंत्री तथा शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी त्यांच्यावर निशाणा साधला. ते सरकारला धारेवर धरत म्हणाले, सरकारला आता अर्थसंकल्पाचे संतुलन राखणे अवघड झाले आहे. त्यामुळे राज्यावरील आर्थिक बोजा वाढला आहे. सद्यस्थितीत राज्याचे आर्थिक संतुलन पूर्णतः ढासळले आहे. यामुळे राज्यातील गरिबांवर, दुर्लक्षित समाजावर अन्याय होत आहे.एसटी, एससी, ओबीसी यांच्यावर होणारा खर्च कागदावर दाखवला जातो हे ३१ मार्चला कळते. पण प्रत्यक्षात त्यावर काहीच पैसा खर्च झाला नाही. तीच पुनरावृत्ती यंदा हे सरकार करत आहे.

जयंत पाटील पुढे म्हणाले, चालू आर्थिक वर्षात मांडलेल्या अर्थसंकल्पात सरकारने एक विक्रम केल्याचा उल्लेख मी केला होता. त्यावेळी महसुली तूट ही ४५ हजार ८९१ कोटी रुपयांची होती. राज्याच्या अर्थमंत्र्यांनी आज पुन्हा पुरवणी मागण्या माडल्या. त्या ५७ हजार ५०९ कोटींच्या आहेत. सरकारचे बहुमत असल्यामुळे या मागण्या मंजूर होतील. त्यावेळी सरकारला १ लाख ३ हजार ४०० कोटी कमी पडणार आहेत. पूर्वीच्या व आताच्या पुरवणी मागण्या मिळून सरकारने अजून एक विक्रम रचला आहे. पुरवणी मागण्या मांडायच्या आणि ते पैसे खर्च करायचे नाही असा प्रकार या सरकारने सुरू केला आहे.

यापुढे हिवाळी अधिवेशन येणार आहे. त्यानंतर पुढचा अर्थसंकल्प मांडण्यापूर्वी आणखी एक पुरवणी मागणी येणार. याचा अर्थ हे सरकार राज्याची महसुली तूट दीड किंवा २ लाख कोटींपर्यंत पोहोचवेल. याचा अर्थ असा की, सरकारला सर्व आकडे कागदावर दाखवणे आवश्यक आहे. अन्यथा ज्यांच्याकडून पैसे घेतले आहेत किंवा ज्यांचे देणे बाकी आहे, असे लोक एकतर आत्महत्या करतील अन्यथा यांच्या मागे लागतील. त्यामुळे सरकारने राज्याच्या अर्थकारणामध्ये एवढ्या मोठ्या तुटीपर्यंत पोहोचण्याचे धाडस केले आहे, असे जयंत पाटील म्हणाले.

# पालिकेच्या निवडणुका नसत्या तर इतका विरोध झाला नसता

## उद्धव ठाकरेंच्या विरोधामागे राजकारणच असल्याचा फडणवीस यांचा दावा

**मुंबई (वृत्तसंस्था)**

पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना तृतीय भाषा म्हणून हिंदी शिकवण्याच्या मुद्यावरून काढण्यात येत असलेल्या मोर्चावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीका केली आहे. ही केवळ राजकीय भूमिका आहे असे मी म्हणणार नाही. कोणाच्याही समोर प्रश्नचिन्ह निर्माण करणार नाही. मात्र महानगरपालिकेच्या निवडणुका नसत्या तर कदाचित इतका वेगळ्या पद्धतीने विरोध झाला नसता. असा दावा फडणवीस यांनी केला आहे.मनसे प्रमुख राज ठाकरे हे माझे चांगले मित्र आहेत. म्हणून काय झाले? मात्र त्यांच्या काही भूमिका आहेत. तर माझ्या काही भूमिका आहेत. सर्वांच्या सारख्या भूमिका असत्या तर सर्व एका पक्षात राहिले असते. त्यामुळे भूमिका वेगळ्या असू शकतात. मात्र उद्धव ठाकरे यांनी जर एखादा रिपोर्ट स्वीकारला आणि आता त्याच्या विरोधात ते बोलताय, तर याचा अर्थ केवळ राजकीयच आहे. या राज्यात माशेलकर, मुणगेकर, सुखदेव थोरात यांच्यासारख्या लोकांवर प्रश्नचिन्ह लावता येईल का? असा प्रतिप्रश्न फडणवीस यांनी विचारला आहे.

देवेंद्र फडणवीस यांना राजकारण करायचय, त्यामुळे देवेंद्र फडणवीस काहीतरी करतोय. मात्र या लोकांना देखील राजकारण करायचे आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. अशा लोकांनी जर एखादा रिपोर्ट दिला आणि तो तुम्ही स्वीकारला आहे. आता तुम्ही त्यालाच विरोध करता? याचा अर्थ मराठीचा प्रेम नाही तर राजकारण असल्याचा स्पष्ट आरोप देखील फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केला आहे.

मराठी आणि हिंदी कॉम्पिटिशन झाली तर पहिली मराठीच निवडली जाईल. मराठी सोबत कोणतीही कॉम्पिटिशन नाही. मात्र त्याचवेळी आमच्या मुलांना तीन भाषा शिकायच्या आहे. तीन भाषा शिकले नाही तर नवीन शैक्षणिक धोरणाप्रमाणे क्रेडिट मिळणार नाही. नवीन भाषा न शिकल्यामुळे मराठी विद्यार्थ्यांचे क्रेडिट कमी होणार आहे. त्यामुळे चांगले मार्क घेऊन देखील राष्ट्रीय पातळीवरील संस्थांमध्ये मराठी विद्यार्थ्यांचा नंबर लागणार नाही. हे मराठी भाषिक विद्यार्थ्यांना मागे ओढण्यासारखे आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निर्णयामागचे कारणही सांगितले. यामागे एक सायंटिफिक प्रोसेस आहे. या प्रोसेस मध्ये आपले विद्यार्थी पुढे कसे गेले पाहिजे, या दृष्टिकोनातून तयार केलेले त्रिभाषा सूत्र आहे. ते तयार करत असताना विद्यार्थ्यांची बुद्धी सर्वात जास्त कधी चालते, भाषा शिकण्याची शक्यता कधी अधिक असते. या संदर्भातले रिसर्च करून त्या कालावधीमध्ये त्यांना भाषा शिकवल्या तर ते अधिकच्या भाषा शिकू शकतात, अशा प्रकारचा मुद्दा समोर आला. हा आमच्यासाठी प्रतिष्ठेचा विषय नाही. कुठलीही भाषा शिका, हिंदीच शिकली पाहिजे असे नाही. हे आम्ही एका मिनिटात सांगितले. हिंदी सक्तीला यांचा विरोध नाही तर यांचा विरोध केवळ हिंदीला आहे. भारतामध्ये तुम्हाला इंग्रजी चालते, तीला तुमचा विरोध नाही. परकीय भाषा चालते मग भारतीय हिंदी का चालत नाही? असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केला. राज्यातील संस्थांमध्ये डमिशन तुम्ही ठरवाल. मात्र राष्ट्रीय पातळीवरील संस्थांमध्ये सर्व निवड सिईटीने होत आहे. यात आपण मराठी मुलांचे नुकसान करत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. हा मुद्दा भावनेपेक्षा वस्तुस्थिती समजून घ्यायचा आहे, असे आवाहन देखील त्यांनी केले. सत्तेत असताना वस्तुस्थिती समजून घ्यायची, कमिटी तयार करायची, त्यांचा रिपोर्ट स्विकारायचा, आणि विरोधी पक्षात गेल्यानंतर भूमिका बदलायची? अशा शब्दात विविध फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे.



### विधानभवनातील पासेसवरून अशोक स्तंभ गायब

## भाजपकडून संविधानाची गळचेपी, रोहित पवारांचा हल्लाबोल; जितेंद्र आव्हाडांनीही साधला निशाणा

**मुंबई (वृत्तसंस्था)**–आजपासून राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू झाले आहे. विरोधकांनी सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. तसेच मी मराठी, अभिमान मराठी असा मजकूर असलेल्या टोप्या देखील विरोधी पक्षाच्या नेत्यांनी घातल्या होत्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी एका गोष्टीकडे लक्ष वेधले. विधानभवनातील पासेसवरून अशोकस्तंभ हटवल्याचा दावा त्यांनी केला आहे. यावर आमदार जितेंद्र आव्हाड यांनी देखील टीका केली आहे.

रोहित पवार म्हणाले, विधिमंडळाचा पास आहे म्हणजे जिथे कायदे केले जातात महाराष्ट्राचे त्या पासवर मध्ये अशोकस्तंभ होता. आता हळूहळू हा अशोकस्तंभ सगळीकडून काढला जाईल. आज आपण जर बघितले तर संविधानाची गळचेपी भाजपकडून केली जात आहे, अशी टीका त्यांनी केली आहे.आमदार जितेंद्र आव्हाड यांनी देखील याच मुद्द्यावरून सरकारवर टीका केली आहे. ते म्हणाले, आपल्या सगळ्या पासेस म्हणजे जे सरकार विधिमंडळ इश्यू करतो त्यावर नेहमी अशोकस्तंभ असायचा. यापूर्वीचे सगळे पासेस तपासून बघा सगळ्यावर अशोकस्तंभ आहे. पीएच्या पासवर अशोकस्तंभ आहे, प्रेक्षकांचे पासवर सुद्धा अशोकस्तंभ आहे. तसेच आम्ही जिथे बसतो तिथे लेटरहेडवर सुद्धा अशोकस्तंभ असतो. आता हा अशोकस्तंभच गायब झाला आहे.पासेसवरून अशोकस्तंभ गायब झाल्याचा आरोप झाल्यावर राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांना पत्रकारांनी याबाबत प्रश्न विचारला. यावर उत्तर देताना सामंत म्हणाले, या संदर्भात विधानसभेच्या अध्यक्षांनी स्पष्ट असे सांगितले आहे की, असे जर झाले असेल तर त्याची मी चौकशी करेल आणि ज्यांच्याकडून झाले आहे त्यांच्यावर कारवाई करेल, अशी प्रतिक्रिया सामंत यांनी दिली आहे.

### काँग्रेसच्या नेत्यांची राजधानी दिल्लीत महत्त्वाची बैठक

## आगामी महापालिका निवडणुकीवर चर्चा हर्षवर्धन सपकाळांचा भाजपवर हल्लाबोल

**मुंबई (वृत्तसंस्था)**–महापालिका निवडणुका जवळ येत असताना, महाराष्ट्र काँग्रेसमध्ये मोठे फेरबदल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर आज, ३० जून रोजी राजधानी दिल्लीत काँग्रेस पक्षाची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीसाठी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, नेते विजय वड्डेटीवार, माजी मुंबई अध्यक्ष भाई जगताप, सध्याच्या मुंबई अध्यक्ष वर्षा गायकवाड, नेत्या यशोमती ठाकूर आणि वरिष्ठ नेते माणिकराव ठाकरे हे दिल्लीमध्ये दाखल झाले.

या बैठकीत आगामी महापालिका निवडणुका, पक्ष संघटनात्मक मजबूती आणि राज्यातील सद्य घडामोडी या संदर्भात महत्वपूर्ण चर्चा झाल्याची माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे. महाराष्ट्र काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या नेतृत्वात ही बैठक राजधानी दिल्ली येथील काँग्रेस मुख्यालयात पार पडली.

तत्पूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेत हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजप सरकारवर जोरदार हल्लाबोल केला होता. ते म्हणाले, हिंदी सक्तीचा विषय नंतरचा भाग आहे. हा शासन निर्णय रद्द करण्यासाठी आम्ही घेतला होता. एक वादळ तयार करण्यासाठी आणि समाज काय म्हणतो हे चाचपण्यासाठी हा निर्णय घेतला होता. भाजप बंच ऑफ थॉटच्या अनुषंगाने सरकार चालवत आहे. विविधतेत एकता त्यांना नष्ट करायची आहे. मराठी ही फक्त भाषा नाही तर ही संस्कृती आहे आणि आम्ही भाजपला त्याच्यासोबत खेळू देणार नाही. हा विषय अधिवेशनात घेतला जाणार हे भाजपला माहीत होते, मात्र ते फ्लोअर मॅनेजमेंटवर चर्चा करायला तयार नसतात.


## सरकार कुणाच्याही दबावापुढे झुकणार नाही

# ठाकरे बंधूंनी एकत्र क्रिकेट खेळावे,स्वीमिंग करावी आम्हाला काहीही अडचण नाही-देवेंद्र फडणवीस

**मुंबई (वृत्तसंस्था)-हिंदी सक्तीचा निर्णय मागे घेतल्यानंतर विरोधकांनी महायुती सरकारची चौफेर कोंडी करण्याचा प्रयत्न केला आहे. पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपले सरकार कुणाच्याही दबावापुढे झुकणार नसल्याचे ठणकावून सांगितले आहे. सरकारने हिंदीच्या मुद्यावर एक समिती स्थापन केली आहे. ही समितीच आता योग्य तो निर्णय घेईल. सरकार केवळ कोणत्याही पक्षाचे हित पाहणार नाही, केवळ महाराष्ट्राच्या विद्यार्थ्यांचे लक्ष पाहील. आम्ही कुणाच्याही दबावापुढे झुकणार नाही, असे ते म्हणालेत. ठाकरे बंधूंनी एकत्र येऊन क्रिकेट खेळावे, स्वीमिंग करावी आम्हाला काही अडचण नाही, असा टोलाही त्यांनी यावेळी ठाकरे बंधूंना हाणला.भाजप नेते रवींद्र चव्हाण यांनी सोमवारी भाजप प्रदेशाध्यक्ष पदासाठी अर्ज भरला. त्यांची या पदासाठी निवड जवळपास निश्चित आहे. त्याची औपचारिक घोषणा उद्या होण्याची शक्यता आहे. यावेळी पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदीच्या कथित सक्तीच्या मुद्यावर सरकार कुणापुढेही न झुकता विद्यार्थी हिताचा निर्णय घेईल असे स्पष्ट केले.**

फडणवीस म्हणाले, मी काय दोन भावांनी एकत्रित न येण्याचा जीआर काढला आहे काय? मी असा कोणताही जीआर काढला नाही. उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात जो अहवाल आला होता, त्या अहवालात त्यांचा उजवा हात मानला जाणाऱ्या उपनेत्याने पहिली ते बारावी हिंदी सक्तीची करा असे लिहिले होते. हा अहवाल उद्धव ठाकरे यांनी मंत्रिमंडळ बैठकीत स्वीकारला. त्यानंतर नेहमीच्या सवयीप्रमाणे घुमजाव केले. त्यानंतरही आम्ही कोणताही इगो न मानता त्यासंदर्भातील निर्णय केला आहे. मी पुन्हा एकदा सांगतो. आम्ही निर्णय केला, आता समिती स्थापन केली आहे. ही समितीच आता योग्य ते ठरवेल. आम्ही कोणत्याही पक्षाचे हित पाहणार नाही. आम्ही महाराष्ट्राच्या विद्यार्थ्यांचे पाहू. महाराष्ट्राचे सरकार विद्यार्थ्यांच्या हिताचाच निर्णय घेईल. आम्ही कुणाच्याही दबावापुढे झुकणार नाही.फडणवीस यांनी यावेळी ठाकरे बंधूंच्या विजयी मोर्चावरही भाष्य केले. ते म्हणाले, ठाकरे बंधू एकत्र येत असतील तर मला त्याचा अतिशय आनंद आहे. त्यांनी जरूर एकत्र यावे. फक्त राज ठाकरे यांनी पहिली ते बारावीपर्यंत हिंदी सक्तीची सक्ती करण्याचा निर्णय तुमच्या काळात का घेण्यात आला हा प्रश्न मला विचारण्यापेक्षा उद्धव ठाकरे यांना विचारला पाहिजे. बाकी त्यांनी एकत्र येऊन क्रिकेट खेळावे, हॉकी खेळावी, टेनिस खेळावे, स्वीमिंग करावी, जेवण करावे आम्हाला काही अडचण नाही.मुख्यमंत्र्यांनी यावेळी उद्धव ठाकरे यांनी जनसुरक्षा विधेयकाला केलेल्या विरोधाचाही चांगलाच समाचार घेतला. ते म्हणाले, हे दुटप्पी लोक आहेत. यांचे सत्तेतील रुप वेगळे असते व विरोधातील रुप वेगळे असते. खासगीत विचारले तर आणखी वेगळे रुप असते. त्यामुळे ते काय म्हणतात याच्याशी आम्हाला काही देणेघेणे नाही. आम्ही महाराष्ट्राला, महाराष्ट्राच्या जनतेला, भारताच्या संविधानाला उत्तरदायी आहोत.

भारताच्या संविधानाचा कुणी अवमान करत असेल तर त्याच्यावर कारवाई करण्यासाठी कायदा तयार होईलच. हा कायदा केवळ त्यांच्याविरोधात आहे, जे भारताचे संविधान मानत नाहीत. जे भारतात अराजक माजवत आहेत. त्या अराजकवादी शक्तींच्या विरोधात कायदा आहे. त्यांचा अराजकतेला पाठिंबा असेल, तर त्यांनी तसे स्पष्ट करावे. अराजकतेला पाठिंबा द्यायचा आणि लोकशाहीचे समर्थन करायचे. संविधान पायदळी तुडवणाऱ्यांच्या सोबत उभे राहायचे हे कुठेतरी बंद केले पाहिजे, असे फडणवीस म्हणाले.दरम्यान, देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांच्या नाराजीवरही सूचक भाष्य केले. अलीकडच्या काळात ते कविता, शेरोशायरी माध्यमातून आपली नाराजी व्यक्त करत आहेत. त्यांचे नवीन स्टेटस येईल त्यावरून तुम्ही अंदाज बांधा, असे ते म्हणाले.देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणुकीवरून काँग्रेसलाही टोला हाणला. काँग्रेसने स्थानिक स्वराज्य संस्था स्वबळावर लढली काय किंवा कुणासोबत मिळून लढली काय? हा प्रश्न नाही. परिणाम अगोदरच ठरलेला आहे. काँग्रेसने जनतेमध्ये जाणे सोडले आहे. जनतेच्या आशा, आकांक्षांपासून काँग्रेस तुटली आहे. काँग्रेसच्या नेतृत्वाला जमिनीवर काय सुरू आहे याची कल्पनाच नाही. ते एका अशा नंदनवनात बागडत असतात, ज्यात अजूनही ते ईव्हीएमच्या पलिकडे जात नाहीत. अजूनही ते निवडणूक आयोगाला दोष देत आपण हरल्याचे समर्थन करत असतात. त्यामुळे जोपर्यंत ते जनतेत जात नाहीत तोपर्यंत ते वेगळे लढो की स्वबळावर लढो त्याची अवस्था तीच राहील, असे फडणवीस म्हणाले.



## संपूर्ण ग्रामविकास हेच वसंतराव नाईक यांचे स्वप्न-डॉ.हनुमंत सौदागर

**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात वसलेला असून जोपर्यंत गावचा विकास होणार नाही तोपर्यंत महाराष्ट्र विकसित होणार नाही. म्हणूनच संपूर्ण ग्रामविकास हे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री जलनायक वसंतराव नाईक यांचे स्वप्न असल्याचे प्रतिपादन डॉ. हनुमंत सौदागर यांनी केले. ते भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालय केज येथे वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यावेळी ते अध्यक्षस्थानावर बोलत होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य विजय शिनगारे, डॉ. नागेश कराळे, ग्रंथपाल अशोक घोडके, श्रीकांत लुंगारे, श्री.सुजित नाईकवाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी



उपस्थितांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी डॉ. कराळे पुढे बोलताना म्हणाले की, महाराष्ट्राच्या कृषीचा अत्यंत सखोल अभ्यास असणारे आणि त्या दृष्टीने जलसंधारणाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणणारे कृतीशील सुधारक म्हणजे वसंतराव नाईक हे असल्याचे सांगितले. यावेळी प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी , विद्यार्थी उपस्थित होते.

## शासकीय कापुस विक्रीसाठी शेतक-यांनी तयारी करावी-सभापती जयदत्त नरवडे

**माजलगाव । प्रतिनिधी**

शासकीय कापुस खरेदी केंद्रावर कापुस विक्री करण्यासाठी शेतक-यांनी २०२५-२६ या हंगामाकरीता सर्व कागदपत्रांसह तयारी करावी असे आवाहन बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव हरिभाउ सवणे यांनी केले आहे.

सन २०२५-२०२६ या कापूस हंगामाकरीता शासनाच्या हमीदराप्रमाणे सि. सी.आयच्या वतीने शासकीय कापुस खरेदी ८११० रूपये एवढा निश्चीत करण्यात आला आहे. शेतक-यांनी शासकीय कापुस खरेदी केंद्रावर कापुस विक्री करण्यासाठी कापसाची ई-पिक पाहणी करणे आवश्यक आहे ,सात-बारावर कापसाची नोंद असणे आवश्यक



आहे,कापुस खरेदी सर्व पेमेंट आधार लिंक असलेल्या बँक खात्यात केले जाईल,त्याकरीता बँक खात्याला आधार लिंक करणे आवश्यक आहे,त्याचबरोबर आधार कार्ड ला मोबाईल नंबर लिंक करणे आवश्यक आहे. पोस्टल बँकेमध्ये खाते असल्यास त्याची पैसे स्विकारण्याची मर्यादा वाढवलेली आवश्यक असुन याची सर्व तयारी करावी तसेच नंतर ऐनवेळी धावपळ करण्यापेक्षा व परेशान होण्यापेक्षा रिकाम्या वेळात कापूस उत्पादक शेतकरी बांधवांनी हे काम करून ठेवा म्हणजे आपला कापुस शासकीय कापुस खरेदी केंद्रावर घालता येईल. त्यामुळे वरिल सर्व प्रक्रिया आताच पुर्ण कराव्यात असे आवाहन बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव हरिभाउ सवणे यांनी केले आहे.

## माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयामध्ये कै.वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहात साजरी



**माजलगाव । प्रतिनिधी**

मुख्य बाजारावर फुले पिंपळगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयामध्ये हरित क्रांतीचे प्रणेते कै. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून दि.१ जुलै रोजी सकाळी ११ वाजता कार्यालयामध्ये उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त आण्णा नरवडे,संचालक वीरेंद्र दादा सोळंके, प्रभाकरराव होके,कदिर पठाण, सचिव हरिभाऊ सवणे, यांच्या सर्व अधिकारी कर्मचारी बांधव उपस्थित होते.

## माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त माजलगाव येथे कृषी दिन साजरा

**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन कृषी विभाग आणि पंचायत समिती माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमानाने १ जुलै हा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतरावजी नाईक साहेब यांची जयंती कृषी दिन म्हणून पंचायती समिती सभागृह माजलगाव येथे साजरा करण्यात आले

कार्यक्रमाचे उद्घाटन श्रीमती ज्योत्सना मुळीक प्रशासक तथा गट विकास अधिकारी पंचायत समिती माजलगाव यांच्या हस्ते संपन्न झाले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक करताना श्री एस एस भोकरे कृषी अधिकारी पंचायत समिती माजलगाव यांनी स्व.वसंतरावजी नाईक यांचे जीवन चरित्र व कार्य याविषयी उपस्थितना माहिती दिली प्रमुख मार्गदर्शक श्री अतिश चाटे




मंडळ कृषी अधिकारी केसापुरी यांनी सध्याच्या परिस्थितीमध्ये पिकाचे संरक्षण करण्याविषयी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रमुख मान्यवर श्री गणेश बादाडे तालुका कृषी अधिकारी माजलगाव यांनी स्व.वसंतरावजी नाईक साहेब यांनी कृषी क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्य व अमुलाग्र बदल तसेच शेतकऱ्यांना सध्याच्या परिस्थितीमध्ये शेतीमध्ये असणाऱ्या अडचणीवर मात करून नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेतीमधील उत्पादन वाढवण्या विषयी शेतकऱ्यांना संबोधित केले या कार्यक्रमात सन २०२४ -२५ मध्ये घेण्यात आलेल्या विविध पीक स्पर्धेतील विजेत्या शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. श्री डोंगरे साहेब सहाय्यक गट विकास अधिकारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाला श्री शिवाजी शिंदे उद्यान पंडित आणि अण्णासाहेब जगताप वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी उपस्थित होते सदरील कार्यक्रमाला कृषी विभागातील आणि पंचायत समिती येथील अधिकारी,कर्मचारी तसेच कृषी सखी आणि शेतकरी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री गोपीनाथ पवार तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांनी केले व आभार श्री डी. एल. गडपाळे कृषी अधिकारी पंचायत समिती माजलगाव यांनी मानले

## डॉ.जितीन वंजारे आणि डॉ.प्रवीण खेडकर यांच्या संयुक्त विद्यमाने मुंगुसवाडे येथे वारकऱ्यांची सेवा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

संतश्रेष्ठ,राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या पालखीचे आज मुंगुसवाडे येथून प्रस्थान झाले यावेळी मोफत औषधोपचार शिबीर दिले हे शिबीर डॉ प्रवीण खेडकर सर आणि डॉ जितीन वंजारे संजीवनी क्लिनिक मुंगुसवाडे यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडले. यावेळी वारीत आलेल्या सर्व भाविक भक्तांसाठी मोफत चहा, नाश्ता, पाणी बॉटल, बिस्कीट, आणि फळे वाटप करण्यात आले.यावेळी मुंगुसवाडे गावात संत श्रेष्ठ भगवान बाबा यांच्या रथाचे जंगी स्वागत करण्यात आले, एकनाथ वाडी या गावातर्फे जेसीबी नी पुष्पवृष्टी करण्यात आली.भगवान गडाचे मठाधीपती व महंत कृष्णा महाराज यांचे पुष्पवृष्टी करून स्वागत केले, यावेळी गावातील महिला मंडळ यांनी लेझिम खेळून आनंदोस्तव साजरा केला, छोट्या मुलींनी व शाळकरी मुलांनी वारकरी पोशाख परिधान करून पालखीचे स्वागत केले, यावेळी सर्व टाळकरी, माळकरी आणि गावातील सर्व नागरिक वारकरी उपस्थित होते.

वारकरी दिंडी, पालखी आणि विशेष म्हणजे भगवान बाबांचा रथ गावातून वारी जातं असल्याने दर्शन घेणासाठी गर्दी जमा झाली होती. यापूर्वीही नाथ महाराजांची पालखी वारी येथून गेली होती त्यावेळी ही डॉ जितीनदादा वंजारे खालापूरीकर यांच्या संजीवनी क्लिनिक तर्फे मोफत आरोग्य तपासणी देण्यात आली होती. सालाबादा प्रमाणे सामाजिक कार्यकर्ते डॉ जितीनदादा वंजारे खालापूरीकर दरवर्षी मोफत आरोग्यसेवा देतात आणि वारकऱ्यांची सेवा करतात.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077